दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २६६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२१ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे शक्तिप्रदर्शन

# पनवेल महापालिका भाजपच्या छाताडावर बसून महाविकास आघाडीच्या ताब्यात घेऊ

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने रणशिंग फुंकले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने रणशिंग फुंकले आहे. आगामी पनवेल महापालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, कृषी उत्पन्न बाजार समिती, अर्बन बँक यांसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीच्यावतीने सर्व नेतेमंडळी सह कार्यकर्त्यांमध्ये कोणतेही मतभेद न होता मनोमिलन व्हावे यासाठी पनवेलमध्ये महाविकासआघाडीच्या वतीने भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकासआघाडीच्यावतीने एकजुटीचे शक्तीप्रदर्शन करण्यात आले. 'हम सब एक है' या भावनेने आघाडीतील सर्व घटकपक्षांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका स्पष्ट केली. आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीत भाजपचा पराभव करून पनवेल महापालिका भाजपच्या छाताडावर बसून घेऊ, असा निर्धार यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आला.**



यावेळी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, महापालिकेचे काम चालु असताना आज मालमत्ता कराच्या अडचणी आहेत त्याचबरोबर पाण्याच्या अडचणी आहेत. शिवसेना सल्लागार बबन पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही काम करत आहोत. येत्या काही दिवसातच मालमत्ता करामध्ये जी ३०% सवलत दिली होती ती ५०% देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत आणि तसा निर्णय आम्ही लवकरात लवकर आणू हा आम्हाला विश्वास आहे. या मेळाव्याच वैशिष्ट्य असे की यात ५०% हून जास्त तरुणवर्ग आहे. तर माझी तरुणवर्गाला अशी विनंती आहे की पाचही पक्षाचे सगळेजण एकत्र येऊन व सतर्क राहून महापालिका लढवूया. पनवेल उरण महाविकास आघाडीचे असे ठरले होते की, कार्यकर्त्यांसोबत आम्हीच बोलणार आणि मग त्यासाठी बबन पाटील, बाळाराम पाटील, प्रशांत पाटील, आर सी घरत, महेंद्र घरत, अनिल नाईक यांनी आधी कार्यकर्त्यांसोबत बोलायचे. आज इथे हजाराच्या संख्येत कार्यकर्ते जमले आहेत. त्यामुळे यापुढे सर्वत्र मेळावे घेऊ असे ठरले आहे. पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष तथा शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबन पाटील म्हणाले की, लोकांना असे वाटत होते की महाविकास आघाडी ही लोकांचीच झालेली आहे. परंतु असे नसुन कोरोनामुळे प्रमुख कार्यकर्त्यांनी बोलावू शकत नव्हतो. आता कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे आम्ही जो काही विचार केलेला आहे तो सगळ्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचावा यासाठी हा मेळावा घेण्यात आला. आम्ही ठराविक कार्यकर्ते बोलावले होते परंतु कार्यकर्त्यांनी भरभरून प्रतिसाद दिला त्यामुळे इथे लोकांना बसायला ही जागा कमी पडली त्याबद्दल मी दिलिगीरी व्यक्त करतो. सगळ्या कार्यकर्त्यांना आम्ही सगळे का एकत्र आलो आहोत आणि आमची काय भूमिका आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला त्याचबरोबर त्यांचेही मत जाणून घेतले. सगळ्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले आणि जो निर्णय घेतला आहे तो योग्य आहे. भाजपने महाराष्ट्रात, आणि देशात महागाई वाढवून ठेवल्याने एकट्याने निवडणुका लढवण्यापेक्षा एकत्र लढवायचे कार्यकर्त्यांनी सांगितले. आतापर्यंत पनवेलचा काही विकास झालेला नसल्याने एकत्रितपणे आघाडीने निवडणुका लढवायच्या आहेत. रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले की, यापूर्वी महाविकास आघाडी मध्ये शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढलो आता शिवसेना ही महाविकास आघाडीमध्ये आहे. ज्याप्रकारे जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये मतदारसंघ वाढतात तसेच महानगर पालिकेमध्ये होत आहे. मेरिटवर आम्ही काम करणार आहोत. रायगड- नवी मुंबई मध्ये जो सक्षम आहे तोच निवडून येणार त्यामुळे आम्ही उमेदवार कोण असेल ते ठरवु. ग्रामीण भागात, जिल्हा परिषद, पंचायत समिती, बँक, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महाविकास आघाडीचे कार्यकर्ते प्रचंड प्रमाणात आहेत त्यामुळे भाजपला ग्रामीण भागात अडचण होणार आहे. महानगर पालिकेसाठी व्यवस्थित वाटप झाल्यास तुल्यबळ लढत होईल.

नवी मुंबईच्या पाठोपाठ आता पनवेलमध्येही महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीने रणशिंग फुंकले आहे. उमेदवारीसाठी निवड करताना आघाडीत नाराजी होणार नाही यासाठी नेतेमंडळींकडून विशेष फॉर्म्युला आखला जाणार आहे.

## संक्षिप्त...

### मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात

**दै.रायगड नगरी । खेड**

मुंबई गोवा महामार्गावर रस्त्याच्या कडेला उभ्या असेलेल्या ट्रकला हुंदाई क्रेटा कारची जोरदार धडक बसून झालेल्या अपघातात कारमधील एकाचा रुग्णालयाच्या वाटेवर मृत्यू झाला. हा अपघात मुंबई गोवा महामार्गावरील भरणे नजीकच्या हॅप्पीसिंग धाब्यासमोर पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घडला. महामार्गावर पसरलेल्या दाट धुक्यामुळे झालेल्या या अपघातात मृत्यू पावलेल्या प्रवाशाचे नाव रामचंद्र लक्ष्मण कदम असे असून ते मालवण येथून मुंबईकडे जायला निघाले होते.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार मुंबईत बोरिवली येथे राहणारे रामचंद्र कदम हे आपल्या कुटुंबासह क्रेटा कारने मालवण येथे आले होते. येथील काम उरकल्यानंतर रिववारी रात्री ते पुन्हा मुंबईला जायला निघाले. रविवारी रात्री मालवण येथून निघालेले कदम ही महाड येथे काही काल विश्रांतीसाठी महाड येथे थांबणार होते. पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास त्यांची कार भरणे नजीकच्या हॅप्पीसिंग धाब्यासमोर आली तेव्हा महामार्गावर परसलेल्या दाट धुक्यामुळे कार चालकाचा रस्त्याचा अंदाज चुकला आणि ती कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकवर मागून जाऊन जोरात आदळली. या अपघातात कारमधून प्रवास करणे रामचंद कदम हे ६२ वर्षीय प्रवाशी गंभीर जखमी झाले. अपघाताची खबर मिळताच खेड येथील मदत ग्रुपचे अध्यक्ष प्रसाद गांधी व त्यांचे सहकारी आणि खेड पोलिसानी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या अपघातात जखमी झालेल्या रामचंद्र कदम यांना मदत ग्रुपच्या रुग्णवाहिने तात्काळ कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले मात्र या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारीच उपलब्ध नसल्याने जवळ जवळ तासभर कदम यांना उपचार मिळू शकले नाहीत. कळंबणी येथे वैद्यकीय अधिकारी नसल्याने गंभीर जखमी असलेल्या कदम यांना मुंबईत किंवा पनवेल येथे हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार त्यांना पनवेल येथील रुग्णालयात नेले जात असताना वाटेतच त्यांचा मृत्यूने गाठले.

# चालत्या ट्रेनमध्ये चढताना महिलेचा गेला तोल

## आरपीएफ कॉन्स्टेबल काडूराम मीना यांनी वाचवलं महिलेचा जीव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकावर चालत्या ट्रेनमध्ये चढताना एका महिलेचा तोल गेल्याची धक्कादायक घटना घडली. यावेळी त्याठिकाणी उपस्थितीत असलेल्या आरपीएफ कॉन्स्टेबलने प्रसंगावधान राखत महिलेला खेचून तिचा जीव वाचवला.

पनवेल रेल्वे स्टेशनवर घडलेली घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली आहे. सदर महिला पनवेल रेल्वे स्थानकावरून लखनऊ येथे जाणाऱ्या ट्रेनमध्ये कामोठे येथे राहणाऱ्या ज्ञानदेवी राणा या आपला मुलगा अजय याच्यासह चढत होत्या. त्यांची सीट आरक्षित होती.

वेळेवर न पोहोचल्याने ट्रेन सुटल्यानंतर घाई गर्दीने चालत्या ट्रेनमध्ये चढण्याचा प्रयत्न करत होती. ट्रेन ठराविक वेग घेण्याच्यापूर्वी सदर महिलेला ट्रेनमध्ये चढता आले नाही.

त्यातच तिचा तोल गेल्याने ती स्थानकावर घसरली रेल्वे पोलिस काडूराम मीना यांनी क्षणात धाव घेतली नसती तर कदाचित ती प्लॅटफॉर्म मधून रेल्वे रुळावर खेचली गेली असती. महिलेचे जीव वाचविणाऱ्या आरपीएफ कॉन्स्टेबल काडूराम मीना यांचेसर्वत्र कौतुक होत आहे.

# करंजा येथील द्रोणागिरी देवीच्या मंदिरात चोरी

## अज्ञात चोरट्यांनी दानपेटी फोडली ; उरणची मंदिरे असुरक्षित

**दै.रायगड नगरी । उरण**

करंजा ग्रामस्थांची ग्रामदैवता म्हणून हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या आई द्रोणागिरी देवीच्या मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी फोडून रोख रक्कम घेऊन पोबारा केल्याची घटना पुन्हा उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.सदर घटणा ही शनिवारी मध्यरात्रीच्या अंधारात घडली असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे.या घटनेमुळे उरण तालुक्यातील मंदिरे असुरक्षित राहत असल्याने भाविकांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे.




उरण शहरातील श्री हनुमान व श्री शनिदेव मंदिरातील दानपेटी चोरीची घटना नूकताच घडली होती.त्या चोरी प्रकरणातील तपास पुर्णत्वास जातो तोच करंजा ग्रामस्थांची ग्रामदैवता म्हणून हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या आई द्रोणागिरी देवीच्या मंदिरात दानपेटी चोरीची घटना शनिवारी दि.१८ डिसेंबर २०२१च्या मध्यरात्रीच्या अंधारात घडली आहे.चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवत बंद असलेल्या मंदिराच्या दरवाज्याची कडी तोडून मंदिरात प्रवेश केला.आणि मंदिरात असलेल्या दानपेटीचा लॉक तोडून दानपेटीतील रोख रक्कम घेऊन पोबारा केला आहे.मंदिरात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात सदर घटना बंदिस्त झाली आहे.

करंजा गावातील भाविकांना, ग्रामस्थांना मंदिरातील .../२

# कोव्हिड-१९ चा नविन व्हेरियंट ओमायक्रॉनचा प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी प्रशासन सज्ज : प्रशाली दिघावकर

**दै.रायगड नगरी । माणगाव**

कोव्हिड-१९ चा नविन व्हेरीयंट ओमायक्रॉनमुळे दक्षिण आफ्रीका दे-शासह इतर देशांमध्ये मोठया प्रमाणात कोव्हिड-१९ ची रुग्ण संख्या वाढत आहे. नविन व्हेरीयंट ओमायक्रॉन अधिक प्रभावशाली असून कमी वेळेत जास्त व्यक्तींना बाधित करण्याची क्षमता आहे. सदर व्हेरीयंट पुर्वीपेक्षा अधिक धोकादायक असल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने माणगांव उपविभागामधे सर्व आरोग्य यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सुचना माणगांव उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रशाली दिघावकर यांनी आयोजित केलेल्या



आढावा बैठकीत दिल्या .

यावेळी माणगांव व तळा तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय माणगांव व प्रा.आरोग्य आरोग्य केंद्राचे वैयकिय अधिकारी तसेच तालुका कृषी अधिकारी, वनविभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती. माणगांव उपविभागातील माणगांव व तळा तालुक्यातील काही ठराविक गावांमध्ये परदेशातून येणा-या लोकांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. अशा वेळी परदेशातून येणा-या लोकांची कोव्हिड-१९ ची टेस्ट केली पाहिजे.

तसेच यावेळी माणगांव उपविभागामध्ये आदिवासी कातकरी समाजासाठी नाविण्यपूर्ण योजना राबविणेकामी संबंधित सर्व यंत्रणांना सुचना देण्यात आल्या. .../२

# कर्नाटक प्रकरण : लोणावळा शहरात शिवसेनेकडून जोरदार निदर्शने



**दै.रायगड नगरी । खोपोली**

बेंगळुरू येथील सदाशिवनगरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद सीमाभाग आणि महाराष्ट्रात उमटत आहेत. याच पार्श्वभूमीवर आज लोनावळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुणे जिल्हा संपर्क प्रमुख माजी मंत्री सचिन अहिर यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने करण्यात आली.

सुरूवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिषेक करण्यात आला. यावेळी पुणे जिल्हा उप-प्रमुख शरद हुलावळे, महिला संपर्क प्रमुख शादान चौधरी, शिवसेना अवजड वाहतूक सेना महाराष्ट्र .../२

# अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे नुकसान ; शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

डिसेंबर महिन्याच्या सुरुवा-तीलाच अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने रब्बी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना मोठे नुकसान सोस-ावे लागले आहे. शेतकऱ्यांनी पेरणी केलेली वाल, चवळी, मूग, हरभरा ही पिके शेतात अवकाळी पावसाचे पाणी साचल्याने पूर्ण कुजून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी उध्वस्त झाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी चिरनेर येतील कृषिमित्र प्रफुल्ल खार पाटील यांनी तहसिलदारांकडे एका पत्राद्वारे केली आहे.

भातपिकाच्या कापणी नंतर चिरनेर,कळंबुसरे विभागातील शेतकरी रब्बी पिकांची पेरणी करतात.त्यामध्ये मुख्यत्वे वाल, चवळी, मूग, हरभरा ही पिके घेतली जातात. अनेक शेतकरी टोकन पद्धतीने या पिकांची पेरणी करतात तर काहीजण ट्रॅक्टरने या पिकांची पेरणी करतात. हिवाळ्यातील थंडीत पडणाऱ्या दवाच्या पाण्यावर ही पिके तयार होऊन शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. यावर्षी .../२





# भ्रष्टाचाराला ‘भरती’

आरोग्यसेवा परीक्षेतील पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर ते हिमनगाचे टोक असल्याचा अंदाज अवघ्या पंधरवड्यात खरा ठरला असून, राज्यातील भरती प्रक्रियेशी संबंधित विविध यंत्रणांत भ्रष्टाचाराची कीड खोलवर पसरल्याचे स्पष्ट होत आहे. परीक्षा परिषदेच्या आयुक्तांसह काही अधिकारी आणि कर्मचारी या प्रकरणांत अडकल्याचे दिसत असले, तरी प्रत्यक्षात अनेक बडी धेंडे गुंतली असण्याची शक्यता अधिक. त्यामुळे या प्रकरणांचा सखोल तपास होण्याची, त्यांमधील सर्व दोषींना कोणताही मुलाहिजा न बाळगता अटक करण्याची, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची आणि भरती प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शी करण्याची गरज आहे. आजवरचा अनुभव पाहता या बाबी प्रत्यक्षात येण्याची शक्यता कमी दिसते; पण तसे झाल्यास भ्रष्टाचाराची कीड संपूर्ण यंत्रणेलाच गिळंकृत करू शकते. त्यामुळे ही विषवल्ली वेळीच उखडून टाकायला हवी. शासकीय सेवेचे स्वप्न उराशी बाळगून त्यासाठी तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांचा आणि एकूणच समाजाचा विश्वास कायम राखण्यासाठी कारवाईचे कठोर पाऊल उचलायला हवे. वास्तविक हे यापूर्वीच व्हायला हवे होते; परंतु ते न झाल्याने त्यामध्ये गुंतलेल्यांचा धीटपणा वाढला, परीक्षा घेण्याच्या यंत्रणेच्या खासगीकरणापासून काळ्या यादीतील कंपन्यांना कंत्राटे देण्यापर्यंत आणि खासगी क्लासेसशी संधान साधून प्रश्नपत्रिका फोडण्यापासून उत्तरपत्रिका लिहिण्यापर्यंतचे अनेक गैरप्रकार होत गेले आणि कोट्यवधी रुपयांचे गैरव्यवहार होत गेले. आपण कधीच पकडले जाणार नाही अशा आविर्भावात ही मंडळी वावरत असतानाच आरोग्य सेवा भरतीतील गैरप्रकार समोर आला आणि गैरव्यवहारांची साखळी उलगडत गेली. आता सगळा भरती घोटाळा उघडकीस आणायला हवा. आरोग्यसेवा आणि ’म्हाडा’च्या भरती परीक्षा असोत किंवा शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) या साऱ्यांतील गैरव्यवहारांत काही समान धागे आहेत. काळ्या यादीत असलेल्या खासगी कंपनीला परीक्षा घेण्यासाठी कंत्राट देत, खासगी क्लासचालकांशी हातमिळवणी करून पेपर फोडत, लाखो रुपये मोजणाऱ्यांना पेपर देत आणि काहींच्या उत्तरपत्रिकाही तयार करून हा भ्रष्टाचार झाला आहे. तीन परीक्षांच्या बाबतीत तो उघडकीस आला असला, तरी आणखी अनेक परीक्षांत घडला असावा. या प्रकरणांतून काही स्वाभाविक प्रश्न उपस्थित होतात. त्याची उत्तरे मिळायला हवीत. गैरप्रकार होत असताना वरिष्ठ अंधारात होते, की त्यांपैकी काही याला सामील होते हे समजायला हवे. खासगी कंपन्यांसाठी, त्यातही काळ्या यादीतील कंपन्यांसाठी आग्रह यांतून गैरप्रकाराचा वास येत असूनही त्याकडे का दुर्लक्ष झाले, याचेही उत्तर मिळायला हवे. काही प्रकरणे तर पूर्वीपासून चालत आली आहेत. उदाहरणार्थ, ’टीईटी’चे प्रकरण २०१७ पासून सुरू आहे. आता अटकेत असलेले परीक्षा आयुक्त तुकाराम सुपे यांनीच गुण वाढवून देण्यासाठी आठशे उमेदवारांकडून ४.२० कोटी रुपये घेतल्याचा आरोप आहे. त्यांच्या घरी ८८ लाख रुपयांची रोकड सापडली आहे. सुपे, परीक्षा आयोगातील तांत्रिक सल्लागार अभिषेक सावरीकर, जी. ए. सॉफ्टवेअर कंपनीचे अधिकारी, काही खासगी क्लासचालक यांच्या चौकशीतून भरतीतील भ्रष्टाचाराची गंगा कशी वाहतेय हे समजेल; पण खरे आव्हान आहे ते हा भ्रष्ट प्रवाह थांबविण्याचे. सरकार ही काही रोजगार देणारी यंत्रणा नाही; रोजगार तयार करणारे धोरण सरकारने राबवायला हवीत. मात्र, त्यात सर्वच सरकारांना अपयश आल्याने आणि बहुतांश खासगी नोकऱ्यांत पिळवणूक असल्याने सरकारी नोकऱ्यांचे आकर्षण वाढत आहे. शेकड्यांतील जागा भरण्यासाठी लाखोंच्या संख्येने अर्ज येत आहेत. त्यात ग्रामीण युवकांचे प्रमाण अधिक आहे. त्यांची तयारी करून घेण्यासाठी खासगी क्लासेसची बाजारपेठ विकसित झाली आहे. या साऱ्यांमुळे स्पर्धा तीव्र बनली असून, नोकरी मिळविण्यासाठी वाट्टेल ते टोक गाठणारे वाढले आहेत. यातूनच भ्रष्टाचाराला पोषक वातावरण तयार होत गेले. त्यात भर पडली ती राज्याच्या भरती धोरणामुळे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) या संस्थेद्वारे सारी भरती न करता, त्याला कमकुवत ठेवून थेट खात्यांमार्फत भरती करण्याचे धोरण राबविले गेले. ही खाती खासगी संस्थांमार्फत परीक्षा घेऊ लागली आणि भ्रष्टाचाराला रान मोकळे होत गेले. राज्यात सरकार कोणाचेही असले, तरी या परिस्थितीत फरक पडला नाही. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी अशा प्रकारे खेळ खेळला जाऊ लागला. नवी पदनिर्मिती तर सोडाच; रिक्त पदेही वेळेत न भरणे, नियमित वेळापत्रक न राबविणे, पात्र झालेल्यांना वेळेत सेवेत न घेणे यांमुळे उमेदवारांत वैफल्य वाढत गेले. काहींनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले. तरीही सत्ताधारी खडबडून जागे झाले नाहीत. काही घोषणा केली गेल्या; परंतु अंमलबजावणी झाली नाही. आता एकामागून एक गैरप्रकार बाहेर येत आहेत. झालेल्या सर्व चुका सुधारण्याची ’एमपीएससी’द्वारेच सर्व परीक्षा परदर्शकतेने घेण्याची आणि त्यासाठी तिला सक्षम करण्याची गरज आहे.

## नागोठण्यातील रामनगरमध्ये श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील रामनगर येथील श्री साई मित्रमंडळ, रामनगर ग्रामस्थ मंडळ व साईबाबा उत्सव समिती यांच्या वतीने श्री साईबाबा मंदिरातील मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा २० वा वर्धापन दिन तसेच श्री साईबाबांच्या नवीन मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा पहिला वर्धापन दिन श्री दत्त जयंतीच्या दिवशी शनिवार दि.१८ डिसेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने त्याच दिवशी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या पालखी सोहळ्यात श्री साई मित्रमंडळाचे अध्यक्ष लिलाधर तुरे, सोमेश्वर सोनी, चंद्रकांत भिंगारे, हनुमान बेलोसे, संजय पानकर, सुरज भिंगारे, गणेश मोरे आदींसह रामनगर मधील ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

रामनगर मधील श्री साईबाबा मंदिरातील या उत्सवाची सुरुवात सकाळी ८.३० वाजता सौ. व श्री. अनिकेत बेलोसे यांच्या हस्ते श्री साईबाबांच्या मुर्तीवर दुग्धाभिषेकाने करण्यात आली. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता सौ. व श्री. शुभम गुप्ता यांच्या हस्ते कार्यक्रम स्थळी ध्वजारोहन करण्यात आले. त्यानंतर सौ. व श्री. चेतन लिलाधर तुरे यांच्या हस्ते श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. नंतर दुपारी १२.१५ वाजता श्री साईबाबा मूर्तीवर पुष्पवृष्टी करण्यात येऊन नंतर महाआरती घेण्यात आली.

दुपारी रामनगर मधील सर्व ग्रामस्थांनी साई भंडारा (महाप्रासादाचा) लाभ घेतला. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता मंदरातून सुरु झालेला श्री साईबाबा पालखी सोहळा मंदिरात परतल्यानंतर या श्री साईबाबा उत्सव सोहळ्याचा समारोप करण्यात आला. हा सर्व सोहळा यशस्वी होण्यासाठी रामनगर ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळाने सहकार्य केले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, शेतकरी १) श्री.दादुमिया अहमदमिया डावलकर, २) श्री.नुर दादूमिया डावलकर, ३) श्रीमती.मेहरुनिसा दादुमिया डावलकर उर्फ मेहरुनिसार दस्ती पटेल, ४) श्रीमती.साबिरा दादुमिया डावलकर, ५) श्री.दिलावर हाजिमियाँ तिधारे, ६) श्री.सिकंदर हाजिमियाँ तिधारे, ७) अब्दुल लतीफ हाजिमियाँ तिधारे रा.तळोजा पाचनंद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.२१४ येथील खारघर नोड, प्लॉट नं.११ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मेसर्स ओम साई कंन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार १) श्री.मधु वि.बठीजा २) श्री.मनिष एम.बठीजा, ३) श्री.अमित एम.बठीजा रा.अमित अशियाना, धर्मादास सोसायटीच्या समोर, गोल मैदान जवळ, उल्हासनगर-४२१००२ यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक २१४ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३४ सी | ११ | ११९९.१४ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८७९४१६४८३**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## करंजा येथील द्रोणागिरी देवीच्या मंदिरात चोरी

चोरीची घटना कळताच गावातील ग्रामस्थांनी सदर घटनेची माहिती उरण पोलीस यंत्रणेला कळविण्यात आली आहे. पोलीस यंत्रणेने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मंदिर परिसराची पाहणी करून तपास सुरू केला आहे.एकंदरी उरण तालुक्यात मंदिरातील दानपेटी चोरी प्रकरणाची ही दुसरी घटना घडल्याने भाविकांचे श्रध्दास्थान असलेली मंदिरे असुरक्षित तर नाहीत ना असा प्रश्न ग्रामस्थांसमोर पडला आहे.आई द्रोणागिरी देवीच जागृत मंदिर करंजा गावात आहे.अशा मंदिरातील दानपेटीची घटना घडत असेल तर त्या चोरी प्रकरणाचा तपास उरण पोलीस यंत्रणेने जळद गतीने लावावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी केली आहे.

## प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी प्रशासन सज्ज : प्रशाली दिघावकर

यामध्ये आदिवासी वाडीवर घरकुल योजना राबविणे, बचत गट स्थापन करणे, जनधन खाते काढणे, सॉईलहेल्थ कार्ड देणे वय वर्ष १४ वरील इच्छुक व्यक्तींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे (पॉटरी, बेकरी पदार्थ बनविणे, शिवणयंत्र, बेनटेक्स व इमिटेशन ज्वेलरी, फार्म हाऊस मॅनेजमेंट), कुशल - अकुशल कामागारांची नोंदणी करणे, फार्म हाऊस मॅनेजमेंट प्रशिक्षण देणे, स्पर्धा परिक्षा यासारख्या अभिनव योजना आदिवासीवाडीवर राबविणेबाबत मार्गदर्शन केले.

कोव्हिड-१९ चा नविन व्हेरीयंट ओमायक्रॉन अधिक प्रभावशाली असून त्यामध्ये कमी वेळेत जास्त व्यक्तींना बाधित करण्याची क्षमता आहे. तरी नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्या व अद्याप कोव्हिडचा पहिला डोस घेतलेला नसल्यास तातडीने लसीकरण करुन घ्यावा. पुढील अवधीत दुसरा डोस पूर्ण करावा आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच गरज असेल तरच घराबाहेर पडावे, आवश्यकता नसताना घराच्या बाहेर पडू नये. नागरिकांनी मास्कचा योग्यरीत्या वापर करावा. असे प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर यानी आवाहन केले आहे.

## कर्नाटक प्रकरण : लोणावळा शहरात शिवसेनेकडून जोरदार निदर्शने

राज्य उपसचिव अल्ताफ मंसुरी, पुणे जिल्हा प्रमुख हेमंत मेणे, जिल्हा सचिव योगेश गिरी गोसावी, शिवसेना शहर प्रमुख बाळासाहेब फाटक, शिवसेना अवजड वाहतूक सेना शहर प्रमुख अमोल कागदे, उपतालुका प्रमुख नरेश काळवीट, तालुका प्रसिद्धी प्रमुख किशोर नरोडे, तालुका उपसचिव बंडू फाटक, शहर सचिव पराग राणे, उप तालुका प्रमुख धनेश हुंडारे, नगरसेविका सिंधू परदेशी, माजी नगरसेवक राजू गवळी, संगिता कंढारे आदी उपस्थित होते.

## अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे नुकसान ; शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी

सुमारे ७० ते ८० हेक्टर जमिनीत शेतकऱ्यांनि या पिकांची पेरणी केली होती.

मात्र १ व २ डिसेंबरला अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने या पिकांची पेरणी केलेल्या शेतांमध्ये पाणी या पिकांचे बियाणे रुजण्यापूर्वीच कुजून गेले आहे.अगोदर लांबलेल्या पावसामुळे भात पिकांचे मोठे नुकसान शेतकऱ्यांना सोसावे लागले आहे. त्यानंतर हमखास उत्पन्न देणारी व कमिखर्चात पिकणारी वाल, चवळी,मूग अशी पिके कुजून गेल्याने शेतकरी पार उध्वस्त झाला आहे.या शेतकऱ्यांना योग्य ती शासकीय नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी चिरनेर येथिल शेतकरी कृषिमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी उरणच्या तहसिलदारांकडे पत्राद्वारे केली आहे.

## तळा नगरपंचायत निवडणूक पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२१च्या पार्श्वभूमीवर दंगल नियंत्रण पथकासह होम गार्ड पोलिस १९ डिसेंबर २१रोजी सांय. ५ वा.पोलीस रूट मार्च काढण्यात आला होता. मांदाड ते बळीचानाका,मोहल्ला, कुभांरवाडा पुसाटी जोगवाडी फोंडळ आळी बाजारपेठ कासार आळी, मुंढे वाडीभोईरवाडी, अशा बहुतेक वार्ड मधून काढला होता.सदर रुट मार्च करीता ०१ पो.नि, ०१ पोसई,१० तळा पोलिस अंमलदार, २८ आर.सी.पी. प्लाटुन, १३ होमगार्ड असे एकुण०२ अधिकारी, ५१ जवान हजर होते.

मा.सहापोलिस अधिक्षक सो, महाड विभाग, अति चार्ज माणगांव विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तळा पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे. सहा पोलीस निरीक्षक शिवराज खराडे सहभागी होऊन प्रचाराची सांगता झाली.

राव साहेब
ॲड.शेखर खोपकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७४५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२२

श्रीमती.सरस्वती महादेव कदम
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वावंढळ, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा अनिल महादेव कदम हे दि.०५/०२/२०२१ रोजी मौजे : वावंढळ, ता.खालापूर, जि.रायगड येथे विनाअपत्य मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत अनिल महादेव कदम यांच्या नावे असलेली बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड या बँकेतील मयत अनिल महादेव कदम यांच्या बचत (खाता क्र.२०१२१७९८८३१) खात्यांत असलेली रक्कम रु.८२,६३५.४६/- (अक्षरी रक्कम रुपये ब्याऐंशी हजार सहाशे पस्तीस रुपये सेहचाळीस पैसे मात्र) या चल मिळकती संबंधात मयत अनिल महादेव कदम यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) शब्बीर मोहम्मद इब्राहीम शेख / फरहाना शब्बीर शेख २) ग्रेटा फ्लोड पिंटो, ३) रेश्मा सदामते, ४) वेणुकुमारी ठाकूर / पप्पू बाबू ठाकूर ५) सचिन गजभिये ६) इम्तियाज बादशाह शेख ७) साजिदा माजिद सिनेना ऑफिस पत्ता : ऑफिस नं-बी ५५/५६ आग्रवाल ट्रेड सेंटर ५ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११ सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती १) अ.वारी गुलामहुसेन तुंगेकर

मिळकतीचे वर्णन

**मौजे : विंधणे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्वे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | पोटखराबा हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २५८/२ | ०.६०.०० | ०.०२.०० | ६.८१ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या व्यवहारास कोणीही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा, हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या-येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर वर मिळकतीच्या मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

बेलापूर
दि.१४/१२/२०२१

**सही/-**
**ॲड.निखत शेख**
**(बी.कॉम.एल.एल.बी.)**
**ऑफिस पत्ता : ऑफिस नं.बी ५५/५६, अग्रवाल टेड सेंटर, ५ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**फोन नं.९३२३१४०६४३**

मा.गोडसे सो.
वकील ॲड.पुजा म. कंदाडे

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात, पनवेल
चौ.अर्ज क्र.१६०६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) रजिया ए. रहमान पटेल, वय : ६६ वर्षे, सज्ञान भारतीय
मयत अब्दुल लतिफ इस्माईल खान बुबेरे यांची मुलगी
रा.घर नं.८६८, तळोजा, तळोजा राईस रोड, प्रायमरी स्कूल,
पोस्ट तळोजा, तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८
२) जुबेदा ए.लतिफ बुबेरे, वय : ६१ वर्षे, सज्ञान भारतीय
मयत अब्दुल लतिफ इस्माईल खान बुबेरे यांची मुलगी
रा.घर नं.८३, तळोजा, दिवान मोहल्ला, जामा मशिदीजवळ,
तळोजा पाचनंद, तळोजा मजकूर, ता.पनवेल,
जि.रायगड ४१०२०८ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

वरील अर्जदारांचे वडील मयत अब्दुल लतिफ इस्माईल खान बुबेरे यांचे दि.१२/०८/१९७६ रोजी त्यांच्या राहत्या घरी तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले. अर्जदाराने मयत अब्दुल लतिफ इस्माईल खान बुबेरे यांचे अर्जदार हे वारस असल्याचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचा दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२० माहे डिसेंबर २०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.गोडसे मॅडम
ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११४६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०२/२०२२

१) श्रीमती.सुरेखा युवराज वाघमारे
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.मयुर युवराज वाघमारे
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.ए-३०२, सागर दिप सोसायटी,
प्लॉट नं.१०/२१, श्रीकृपा हॉलच्या समोर,
से.७, खांदा कॉलनी, पनवेल
३) श्रीमती.शांताबाई आकाराम वाघमारे
वय : ७८ वर्षे, धंदा : गृहिणी
न्यू दुर्गामाता मंदिर रोड, आनंदवाडी,
आंबेडकर चाळ, जुना विठ्ठल मंदिर मागे,
कल्याण पूर्व, कातेमानिवली, ठाणे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी सदरहू अर्जदार, अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.युवराज आकाराम वाघमारे ह्यांचे निधन दि.०८/१२/२०१५ रोजी मौजे : के.ई.एम. हॉस्पिटल, बृन्हमुंबई महानगरपालिका मुंबई येथे झाले आहे.

कै.युवराज आकाराम वाघमारे यांनी त्यांच्या हयातीत खालील वर्णनाची मिळकत विकत घेतलेली आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

**अ) मिळकतीचे वर्णन**

| ठिकाण | सदनिका क्र. | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| सागर दिप को. ऑ.हौ.सो.लि., खांदा कॉलनी | ए ३०२ | १० आणि ११ | ७ | १००० चौ.फूट |

सदरील मिळकत ही कै.युवराज आकाराम वाघमारे यांनी त्यांच्या हयातीत वरील वर्णनाची मिळकत मे.दिनेश एच.दोडीया तर्फे प्रो.श्री.दिनेश एच.दोडीया यांच्या कडून ॲग्रीमेंन्ट फॉर सेलने घेतलेली होती. सदर दस्त सह दु.नि. पनवेल दस्त क्रमांक ७१/२००० अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.युवराज आकाराम वाघमारे यांचे वारसदार या नात्याने कै.युवराज आकाराम वाघमारे यांचे हिश्श्याचे आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.युवराज आकाराम वाघमारे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.सोनावणे सो. यांचे कोर्टात
ॲड.शेखर खोपकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७४४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२२

श्रीमती.सरस्वती महादेव कदम
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.वावंढळ, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा अनिल महादेव कदम हे दि.०५/०२/२०२१ रोजी मौजे : वावंढळ, ता.खालापूर, जि.रायगड येथे विनाअपत्य मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत अनिल महादेव कदम यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**कार्तिक रेसिडेन्सी नं.१, को.ऑप.हौ.सोसायटी लि., फ्लॅट नं.२०७, डी विंग, दुसरा मजला, क्षेत्र ५३० चौ.फूट, सर्वे नं.३-अे, नेवाळी विलेज, ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत अनिल महादेव कदम यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.पांडे साहेब कोर्ट
श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील प्रथमवर्ग न्यादंडाधिकारी यांच्या कोर्टात
क्रिमिनल एम.ए.नं.१३४६/०२१
ने.ता.१२/०१/२०२२

श्री.फरहान हनीफ मेमन, वय : २५ वर्षे
व्यवसाय : इतर, रा.आर्यन तामोदिनी बिल्डींग,
फ्लॅट नं.१५०१, से.२४, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका, खारघर विभाग
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, स्व.रेहाना हनीफ मेमन ह्यांचा मृत्यू दि.३०/०६/२०१३ रोजी खारघर, सेक्टर १२, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव घरातील सदस्यांकडून अनवधानाने स्व.रेहाना हनीफ मेमन यांची मृत्यूची नोंद करायची असून गेली आहे. परंतु काही कारणास्तव मृत्यूची नोंद करून घेणे व मृत्यूची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हाला घरातील सदस्यांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदारांच्या आईची मृत्यूची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणी बद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे मृत्यूची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे मृत्यूची नोंद मंजूर करेल.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** क.लिपीक, फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — **सही/-** सहा.अधिक्षक, फौ.न्याया, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पासपोर्ट कार्यालय 'मुक्काम' पोस्ट च्या प्रतिक्षेत!

## खासदार श्रीरंग बारणे यांचे केंद्रीय दूरसंचार मंत्री यांना साकडे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल पासपोर्ट कार्यालयाला मंजुरी देण्यात आली आहे. मात्र त्यासाठी पोस्टा कडून जागा देण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे नागरिकांना आजही ठाणे कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत. यासंदर्भात मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय दूरसंचार राज्यमंत्री देवुसिंग चौहान यांची भेट घेऊन पासपोर्ट कार्यालयाच्या जागेचा प्रश्न निकाली लावण्याची मागणी केली. याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल अशी ग्वाही त्यांच्याकडून देण्यात आले.

पनवेल महानगरपालिका क्षेत्र आणि ग्रामीण भाग याचा विचार करीत असताना लोकवस्ती ही बारा लाखांच्या ही पुढे गेले आहे. दिवसेंदिवस येथे लोकसंख्या वाढत आहे. पनवेलमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक स्थायिक झाले आहेत. कॉस्मोपॉलिटन महानगर म्हणून या परिसराकडे पाहिले जाते. येथे अनेक आंतरराष्ट्रीय प्रकल्प येऊ घातले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्याचबरोबर औद्योगिक वसाहती या भागांमध्ये आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर परदेशात जाण्यासाठी पासपोर्टची नितांत आवश्यकता असते. पनवेल येथून दररोज शेकडो अर्ज पासपोर्टकरीता केले जातात. त्याकरता थेट ठाणे गाठावे लागते. त्यामुळे पैसे आणि वेळ खर्च होतो अनेकदा हेलपाटे मारावे लागतात.

यामुळे पनवेलला पासपोर्ट कार्यालय असावे अशा प्रकारची मागणी या अगोदर झाली होती. त्यानुसार येथे या कार्याला मंजुरी सुद्धा देण्यात आली. पोस्ट कार्यालयामध्ये पासपोर्ट ची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. मात्र पोस्ट विभागाकडून पनवेल पासपोर्ट कार्यालयाला जागा दिली जात नाही. परिणामी हे कार्यालय आजही कागदावरच आहे. आणि रहिवाशांना थेट ठाणे गाठावे लागत आहे.

दोन्ही विभाग केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याने जागेसंदर्भात अद्यापही तोडगा काढण्यात अपयश आले आहे. त्यामुळे पनवेल मधील नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. स्थानिक खासदार श्रीरंग बारणे यांनी पासपोर्ट कार्यालयाच्या जागेचा प्रश्न निकाली काढण्याच्या हेतूने केंद्रीय दूरसंचार राज्य मंत्री श्री.देवुसिंग चौहान यांची भेट घेऊन जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशी ग्वाही त्यांच्याकडून देण्यात आली.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. सिडको ही पनवेलची नोडल एजन्सी आहे. प्राधिकरणाकडे अनेक ठिकाणी जागा आहेत. याशिवाय भूखंड सुद्धा उपलब्ध आहेत. असे असताना पासपोर्ट सारख्या महत्त्वाच्या कार्यालयाला जागा मिळत नाही. याबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात आले आहे.

नवीन पनवेल येथे नवी मुंबईतील सर्वात मोठे विभागीय पोस्ट कार्यालय आहे. इमारत सुद्धा मोठी आणि प्रशस्त आहे. तरीसुद्धा पासपोर्टकरीता या विभागाकडून जागा दिली जात नाही. या कारणाने मंजुरी मिळूनही पासपोर्ट कार्यालय रखडले आहे.

## संक्षिप्त...

### गुणवंत विद्यार्थी व मान्यवरांचा सन्मान



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धानकान्हे या गावी श्री. दत्तगुरू जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून इ.१० वी,१२ वी गुणवंत विद्यार्थी व विविध क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणा-या मान्यवरांचे प्रमुख पाहुण्यांचे हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

नाथपंथीय गोसावी समाज व ग्रामस्थ मंडळ धानकान्हे,महिला मंडळ व तरूण मंडळ तसेच आदिनाथ सामाजिक संस्था धानकान्हे यांच्या वतीने पारंपरिकरित्या श्री. दत्तगुरू जन्मोत्सव सोहळा धार्मिक, सामाजिक कार्यक्रमानी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देवतांना अभिषेक, सत्यनारायणाची महापूजा,महाप्रसाद, प्रवचन, हरिपाठ व जागर भजन आदी धार्मिक कार्यक्रमांबरोबर सखाराम कचरे,मंगेश पोळेकर, स्मिता शिंदे,महादेव बाईत, सहदेव गोसावी,डॉ.सौ. भादावकर व प्रा.भादावकर आदी विविध क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणारे मान्यवर व चैतन्य हळदे, पुर्वा माहीत, वैष्णवी गोसावी, समिरा कचरे,योगेश पोळेकर आदी गुणवंत विद्यार्थी यांचा सन्मान सोहळा आदी कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

यावेळी रायगड भूषण सरपंच वसंत भोईर,माजी सरपंच अर्जुन कचरे,उपसरपंच सूरज कचरे,शंकर धनावडे, धोंडू कचरे,महादेव माहीत, सुदाम कचरे,यशवंत माहीत, सहादेव बाईत,संतोष भोईर आदी मान्यवरांसह आदिनाथ सामाजिक संस्थेचे पांडुरंग गोसावी, संजय गोसावी, मारूती गोसावी, विनायक गोसावी, जनार्दन गोसावी, दीपक गोसावी, चंदू गोसावी, रामदास नवघरे, नंदा भादावकर, संतोष नवघरे,संतोष गोसावी, गणेश नवघरे,दीपक नवघरे,प्रसाद धनावडे, प्रथमेश गोसावी, सहदेव गोसावी, वैभव गोसावी, मंगेश भादावकर,राजेंद्र भादावकर, मंगेश गोसावी,धोंडू गोसावी,दिनेश भादावकर महादेव गोसावी उपस्थित होते.

## देवकान्हे पिंपळवाडी येथे धर्मीक व आध्यात्मिक कार्यक्रमांनी दत्तजयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील पिंपळवाडी- देवकान्हे येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री दत्तजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवा अंतर्गत श्री गुरू दत्तात्रेय जन्मोत्सव, सायंकाळी रोहा तालुका कोकणदिंडी वारकरी सांप्रदाय यांचे हरिपाठ तद्नंतर महाप्रसाद व रात्रौ ९ वा. ह.भ.प. दिनेशमहाराज कडव यांचे सुश्राव्य हरिकिर्तन आदी धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांनी संपन्न झाले. यावेळी देवकान्हे ग्राम पंचायत सरपंच वसंत भोईर ,राजकीय तथा उद्योजक विजयराव मोरे, रोहिदास शेठ पाशीलकर माजी सरपंच बाळा भोईर ,ज्ञानेश्वर साळुंखे,नारायण कान्हेकर,वरसे ग्राम पंचायत सरपंच नरेश शेठ पाटील,रुपेश कर्नेकर, लीलाधर मोरे, मुकेश भोकटे, रणपिसे, धनंजय आठवले,प्रकाश कोळी,घनश्याम कारले,सुनील थिटे सर पत्रकार नंदकुमार मरवडे,डॉ श्यामभाऊ लोखंडे,शुभम हातकामकर,यांनी दर्शनाचा लाभ घेत ग्रामस्थ मंडळाला शुभेच्छा देत सर्वांचे आर्थिक सहाय्य या कार्यक्रमाला लाभले.

# निडी येथील विहिरीत रसायन मिश्रित पाणी झिरपलेल्या पाणी दुषित : वाल पिकाचेही नुकसान

## ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यासाठी होताहेत हाल

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई-गोवा महामार्गालगत उभ्या असलेल्या टँकर मधून सोडलेले घातक रसायन मिश्रित पाणी नागोठण्याजवळील निडी (ता.रोहा) गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत झिरपण्याची घटना ७ डिसेंबरला रात्री घडली आहे. यामुळे विहिरीतील पाणी दुषित होण्याबरोबरच विहिरीलागतच्या वाल पिकांचेही नुकसान झाले आहे. टँकर मधील हे पाणी घातक रसायन मिश्रित असल्याने या विहिरीतील पाणी काढून विहीर साफ करूनही ते पिण्यास ग्रामस्थ घाबरत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल सुरु आहेत. विहिरीतील पाण्याचे नमुने आधी चांगल्याप्रकारे तपासल्यानंतरच ते पिण्यायोग्य असेल तरच आम्ही ते पिवू अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.



उपलब्ध माहितीनुसार घातक रसायन घेऊन अनेक टँकर रायगड जिल्ह्यातील नागोठणे, धाटाव, महाड एम.आय.डी.सी मध्ये येत असतात. संबधित कंपनी मध्ये रसायन खाली केल्यानंतर त्यात काही प्रमाणात का होईना रसायन शिल्लक राहत असते. नंतर रसायन शिल्लक असलेल्या टँकर मध्ये पाणी भरण्यात येते. हेच रसायन मिश्रित पाणी नंतर चालकाकडून कुठे तरी रस्त्याच्या बाजूला सोडण्यात येत असल्याचे धक्कादायक प्रकार निडी येथील प्रकरणामुळे पुन्हा एकदा उजेडात आला आहे. अशाच प्रकारे धाटाव येथील एका कंपनीतून रसायन खाली करून त्यामध्ये पाणी भरून आलेला एक टँकर निडी येथे महामार्गालगतच असलेल्या एका खासगी जागेत ७ डिसेंबर, २०२१ रोजी सायंकाळी उभा करण्यात आला होता. त्यानंतर सदर टँकर चालकाने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत टँकर मधील रसायन मिश्रित पाणी सोडले. मात्र हे पाणी लगतच्या विहिरीत मोठ्या प्रमाणात झिरपलेच पण त्याचबरोबर विहिरीलगतच्या जमिनीतही झिरपल्याने निडी गावातील गोविंद म्हात्रे, रमेश मढवी व यतीन मढवी या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे व वाल पिकांचे नुकसान झाले आहे. सदर टँकर चालकाला पकडून ग्रामस्थांनी नागोठणे पोलीस ठाण्यातही नेले होते.

सुमारे १५० घरांची वस्ती असलेल्या निडी गावात पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव आधार असलेल्या या विहिरीचे पाणी पिण्यास सध्या भीती निर्माण झाली असल्याने गेले १३ दिवस येथील ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल सुरु आहेत. गावात जेएसडब्लू कंपनीच्या पाण्याची नळ जोडणी काही लोकांकडे असली तरी त्यामधून गढूळ पाणी येत आहे. तर सदर टँकरच्या मालकाकडून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येईल असे पोलीस ठाण्यातून सांगण्यात येऊनही पाणी मिळाले नसल्याचे ग्रामस्थ धर्मा भोपी यांनी पत्रकारांना सांगितले. यावेळी किसान मढवी, प्रवीण बडे, हरिश्चंद्र मढवी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान विहिरीतील पाणी पूर्णता काढून विहीर स्वच्छ करण्यात आली असून विहिरीत पुन्हा जलवाहिनीचे पाणी नव्याने भरण्यात आले आहे. आता या पाण्याचे नमुने आज तातडीने अलिबाग येथील शासकीय प्रयोग शाळेत तपासून पाणी पिण्यायोग्य आहे की, नाही बघितले जाईल असे येथील कोंडगाव ग्रामपंचायतीचे निडी गावातील स्थानिक ग्रा.पं. सदस्य निखील मढवी यांनी सांगितले. यासंदर्भात याप्रकरणातील नागोठणे पोलीस ठाण्यातील तपासकीय अधिकारी स्वप्नील सावंत देसाई यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

# आपत्ती व्यवस्थापन विशेष प्रशिक्षण उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

ओडिशा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे वतीने मधुसूदन दास अकॅडमी ऑफ फायनान्सियल मॅनेजमेंट, भुवनेश्वर या संस्थेत चक्रीवादळ सौमिकरण व पूर्वतयारी बाबतचे विशेष प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. यावेळी रायगड जिल्ह्यातील शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी १५ ते १७ डिसेंबर २०२१ या कालावधीत विशेष आपत्ती व्यवस्थापण प्रशिक्षण पूर्ण केले.

रायगड जिल्ह्याने मागील काही वर्षात निसर्ग, तौक्ते अशा प्रकारची विविध वादळे व अतिवृष्टी, दरड कोसळणे यासारखी नैसर्गिक संकटे अनुभवली आहेत. याचा विचार करुन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना चक्रीवादळ सौमिकरण व पूर्वतयारी अंतर्गत प्रशिक्षणाची असलेली गरज ओळखून जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याबाबतचे नियोजन केले. त्यानुसार त्यांनी रायगड जिल्ह्यातील महसूल, पोलीस, ग्राम विकास विभागाच्या ५० अधिकारी/कर्मचाऱ्यांना दि. १५ ते १७ डिसेंबर २०२१ या कालावधीत मधुसूदन दास अकॅडमी ऑफ फायनान्सियल मॅनेजमेंट, भुवनेश्वर, ओरिसा येथे चक्रीवादळ सौम्यीकरण व पूर्वतयारी या विषयावरील आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणासाठी पाठविले होते.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील महसूल विभाग- ७, पोलीस विभाग- १० पोलीस अधिकारी व १० पोलीस कर्मचारी, १५ होमगार्डस् , श्रीवर्धन सरपंच १, घारापुरी उरण सरपंच १, ग्रामविकास विभाग-६ असे एकूण ५० अधिकारी-कर्मचारी व इतर सहभागी झाले . यानंतरही जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. कल्याणकर व निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डॉ.पद्मश्री बैनाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी ५०-५० च्या दोन पथकांना येणाऱ्या पुढील कालावधीत प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांचा, आपत्ती व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या स्वयंसेवकांचा समावेश केला जाणार आहे.




मा.सोनावणे सो.कोर्ट

अ‍ॅड.त्रिवेणी परदेशी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७६४/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता.०९/०२/२०२२

कै.भास्कर अरविंद देशमुख (मयत) यांचे वारस
१) श्रीमती.सिंधू भास्कर देशमुख
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.सोमनाथ भास्कर देशमुख
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.आशिष भास्कर देशमुख
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार १ व ३ रा.के.एल.२, बि.नं.७,
रुम नं.२, सेक्टर ६ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.भास्कर अरविंद देशमुख ह्यांचे दि.०३/०३/२०२१ रोजी मु.तुकाईवाडी, पो.कोपर्डे, ता.जि.सातारा येथे निधन झालेले आहे. सबब कै.भास्कर अरविंद देशमुख यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. कै.भास्कर अरविंद देशमुख यांच्या नावे खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

सबब खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| मिळकत | किंमत |
|---|---|
| के.ए-२/७/२, सेक्टर ६ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड | रु.२३,२६५/- |

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.भास्कर अरविंद देशमुख यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास अर्जदारांना वारसदाखला मंजूर करण्यात येईल.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर सो.कोर्ट

अर्जदार तर्फे वकील : श्री.सुरज बळीराम गोंधळी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१९०४/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.३/०२/२०२१

१) श्रीमती.सविता प्रेमकुमार गोरे
वय : ३६ वर्षे, धंदा : घरकाम
२) कु.प्रियंका प्रेमकुमार गोरे
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.सोहम प्रेमकुमार गोरे
वय : ७ वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार क्र.२ व ३ अज्ञान तर्फे,
अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क्र.१,
अर्जदार क्र.१ ते ३ रा.पालेखुर्द,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही कै.प्रेमकुमार संग्राम गोरे ह्यांचे मालकीची होती व आहे.

मिळकतींचे वर्णन

ना.कोर्टाच्या स्थळसिमेंत व अधिकार क्षेत्रात, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-तळोजा एम.आय.डी.सी., तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे कै.प्रेमकुमार संग्राम गोरे यांचे नावे बचत खाता क्र.३६५६५६७७३१४ मध्ये रक्कम रु.१०,६५७/- (अखरी रक्कम रुपये दहा हजार सहाशे सत्तावन्न मात्र) आहेत.

कै.प्रेमकुमार संग्राम गोरे हे दि.२७/१०/२०२१ रोजी एम.जी.एम. कामोठे येथे मृत्यू पावले असून, त्यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ ही मुलगी व अर्जदार क्र.३ मुलगा, असे कायदेशीर वारसदार आहेत. कै.प्रेमकुमार संग्राम गोरे यांची आई कै.मथुराबाई संग्राम गोरे ह्या दि.३१/०७/२०२१ रोजी मौजे : हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर येथे मृत्यू पावल्या आहेत. सबब, कै.प्रेमकुमार संग्राम गोरे यांचे खात्यातील रक्कम मिळणेचा कायदेशीर हक्क व अधिकार अर्जदार यांनाच आहे. सदर रक्कमेबाबत सक्सेशन सर्टीफिकेट / वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.प्रेमकुमार संग्राम गोरे यांचे कायदेशर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास, ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्याया, पनवेल**



अर्जदाराचे वकील : रितेश रमेश पाटील

**जाहीर नोटीस**

खालापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.क.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१५५/२०२१

१) श्रीमती.सुभद्रा जनार्दन नेमाणे
वय : ७४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.चौक, पो.चौक, चौक मानिवली, ता.खालापूर, जि.रायगड
२) श्री.विठ्ठल जनार्दन नेमाणे
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
रा.चौक, पो.चौक, चौक मानिवली, ता.खालापूर, जि.रायगड
३) श्री.द्वारकानाथ जनार्दन नेमाणे
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
रा.चौक, पो.चौक, चौक मानिवली, ता.खालापूर, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये नाममात्र (फॉर्मल डिक्लरेशन) वारस दाखला मिळणेसाठी अर्ज

अर्जदार क्रमांक १ हिचे पती व अर्जदार क्रमांक २ व ३ यांचे वडील जनार्दन हरिभाऊ नेमाणे हे दि.२४/०९/२००६ रोजी सकाळी ८.०० वाजताचे सुमारास चौक मारुती मंदिराच्या येथे जावून येतो असे सांगून त्यांचे राहते घरातून निघून गेलेले असून सदर बाबत खालापूर येथील पोलीस स्टेशनमध्ये हरविल्याबाबत मसिंग तक्रार दाखल असून सदर मिसिंग कंम्प्लेंटचा रजि नं.१५/२००६ असा आहे. सदरील मिसिंगचा पोलिसांनी दि.१९/१२/२००९ पर्यंत तपास केला असून सदरील बेपत्ता असलेले जनार्दन हरिभाऊ नेमाणे मिळून आलेले नाहीत. दि.२४/०९/२००६ रोजीपर्यंत जनार्दन हरिभाऊ नेमाणे यांचे मौजे : चौक, पो.चौक, चौक मानिवली, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड येथे कायमचे वास्तव्य होते.

सबब कायद्याचे तरतुदीनुसार एखादी व्यक्ती सात वर्षापेक्षा अधिक कालावधीमध्ये जिवंत असल्याबाबत ऐकिवात नसल्यास ती मयत समजण्याबाबत गृहितक असल्याकारणाने जनार्दन हरिभाऊ नेमाणे हे मयत आहेत असे घोषित करून मिळणेकरिता व अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, कोर्ट कामाकरिता मयताचे नाव कमी करून अर्जदार यांचे नाव लागण्याकरिता तसेच अन्य तद्अनुषंगिक कामाकरिता वारस दाखल्याची जरुरी असल्यामुळे जनार्दन हरिभाऊ नेमाणे हे मयत झझले आहेत असे घोषित करून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबद्दल घोषित करून मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणी व्यक्ती, इसमास सदरच्या अर्जाकामी हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत स्वतः अथवा वकीलांमार्फत हजर राहून आपली हरकत किंवा लेखी म्हणणे द्यावे. अन्यथा वरील मुदतीत कोणतीही हरकत न अआल्यास हरकत नाहीत असे समजले जाईल व अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला मंजूर करणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

कोर्टाच्या शिक्क्यानिशी व माझ्या सहीने आज दि.२०/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, खालापूर**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, खालापूर**



अ‍ॅड.संध्या लोखंडे

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६८१/२०२१

नि.नं.७/ड

ने.ता.२५/०१/२०२२

१) श्री.गिरीश जयराम कातकर
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.राम मंदिराजवळ, १/६२, राम नगर
को.ऑप.हौ.सो.कात्रक रोड, वडाळा, मुंबई ४०००३१ अर्जदार
विरुद्ध
१) सौ.शिल्पा रमाकांत नवेले
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.सी/१४, मेघना पार्क, आपटेवाडी,
समोर पारसी बंगलो, बदलापूर ठाणे ४२१५०३
२) सौ.निलम संदेश तिर्लोटकर
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.३०६, आय विंग, फेस-१, मोहन पामस,
चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगाव पोस्ट,
कुळगाव, बदलापूर, ता.अंबरनाथ ठाणे-४२१५०३ सामनेवाले

वरील अर्जदार व सामनेवाले यांचे वडील कै.जयराम काशिराम कातकर हे दि.१९/०३/२०२१ रोजी जे/३०२, ठाणेकर हिल क्रेस्ट, भोसले नगर, शिरगांव बदलापूर येथे मयत झाले. तसेच कै.जयराम काशिराम कातकर यांची पत्नी श्रीमती.जयश्री जयराम कातकर दि.१६/०९/२०२१ रोजी मु.पो. रामपूर, कातकरवाडी, ता.चिपळुण, जि.रत्नागिरी येथे मयत झाली आणि कै. जयराम काशिराम कातकर यांची आई श्रीमती.सावित्री काशिराम कातकर दि.जुलै १९८८ रोजी मु.पो.रामपूर, कातकरवाडी, ता.चिपळुण, जि.रत्नागिरी येथे मयत झाली आहे. कै.जयराम काशिराम कातकर यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

**शॉप नं.२७, तळमजला, मानसरोवर अपार्टमेंट, बिल्डींग नं.१०, विंग-ए, प्लॉट नं.१,२,४,५,६,१९,२०,२१,२२,२३,२४,२५ आणि २६ सेक्टर-३४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई ४१०२०९ एरिया ऑफ २२४ स्क्वे.फिट, कारपेट-३२० स्क्वे.फिट**

**मालमत्ता मुल्यांकन : रुपये ३,५२,०००/-**
**(रुपये तीन लाख बावन्न हजार मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंत आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## तळा नगरपंचायत निवडणूक प्रचाराच्या तोफा थंडावल्या

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी मंगळवारी २१ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी मागील आठ दिवसांपासून निवडणूक रिंगणात उतरलेल्या उमेदवारांनी व त्यांच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणात आप आपला प्रचार केला आहे.मंगळवारी ही निवडणूक होणार असल्याने रविवार सायंकाळी आदर्श आचार संहिता लागू झाल्याने या प्रचार तोफा थंडावल्या आहेत. आता निवडणूक पार पडे पर्यंत उमेदवारांना जाहीर प्रचार फेऱ्या काढता येणार नाहीत. निवडणुकीसाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असल्याने उमेदवारांनी आप आपली शक्ती व युक्ती लावून आता आतला प्रचार सुरु केला आहे. रात्र वैऱ्याची या युक्ती प्रमाणे रविवार व सोमवार या दोन रात्रीमध्ये मतदारांना आर्थिक प्रलोभने दाखविण्याचा प्रयत्न उमेदवारांकडून होण्याची शक्यता असल्याने रात्रीस खेळ चाले यानुसार सर्व उमेदवार आता या दोन रात्रीमध्ये स्वतः सह पॅनलच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी या दोन रात्रीमध्ये प्रचंड प्रयत्न करणार असल्याने या दोन रात्री उमेदवार व त्यांच्या समर्थकांसाठी वैऱ्याची रात्र ठरणाऱ्या आहेत. दरम्यान नगरपंचायतीमध्ये निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवला असून उमेदवारांच्या हालचालींकडे पोलिस प्रशासनाने लक्ष लागून राहिले आहे.

## खोपोली येथे सिता नगरमध्ये फ्लॅटला आग

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली येथील सीतानगर भागात बी. विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅट मधून धूर येत असल्याचे स्थानिक ग्रामस्थयांनी पाहताच सर्वांना सतर्क केले. अग लागल्याची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दला चे जवान घटना स्थळ हाजर झाले. यावेळी दुर्घटनाग्रस्त घर–ातून येणारे धुराचे प्रमाण अधिक असल्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात अडचणी येत होत्या.घरात कोण्ही उपस्थित नसून घराला कुलूप असल्याने भाहेरून खिडकीच्या काचा फोडून खोपोली अग्निशमन दलाचे फायर मॅन मोहन मोरे यांनी आपले कौशल्य पणाला लावून व खोपोली फायरचे विभागप्रमुख हरिदास सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहन मोरे,संदीप पांचवे,संतोष पवार,अरविंद जाधव, रमिझ शेख यांना सदर आग विझवण्यात यश आले .


# पालीत माकडे आणि वानरांचा उच्छाद वाढला; लहान मुलांवर हल्ले

## कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात माकड व वानरांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यांच्या उपद्रवामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. या नव्या समस्येने पालिकर हैराण झा–लेत, वृद्ध व महिला लहान मुले यांच्यावर माकडे हल्ला करीत असताना असुरक्षित पनाची भावना वाढीस आली आहे.

मागील आठवड्यात देऊळवाडा येथील एका शाळकरी लहान मुलावर वानराने पाठीमागून हल्ला केला होता. दप्तर असल्याने तो वाचला. मालमत्तेच्या नुकसानीबरोबरच काही लोकांवर देखील या माकडांनी हल्ले करून जखमी केले आहे. त्यामुळे या वानर व माकडांचा कायम स्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी वनविभाग व तालुका प्रशासनाकडे सुज्ञ नागरिकांनी केली आहे.



सकाळ देखील मागील अनेक वर्षे बातम्यांच्या माध्यमातून ही समस्या मांडत आहे. पालीतील राम आळी, बाजारपेठ, बल्लाळेश्वर मंदिर परिसर, देऊळवाडा, मधली आळी, खडकाळी, कासार आळी, सोनार आळी, आगर आळी, बेगर आळी, उंबरवाडी, सावंत आळी, अशा सर्वच गजबजलेल्या भागात माकडे आणि वानरे रोज धुमाकूळ घालत आहेत. मोठमोठी वानरे आणि माकडे छतावर उड्या मारून घराचे पत्रे व कौले फोडतात. तसेच ड्रेनेजचे पाईप, विजेच्या तारा, गच्चीत ठेवलेले सामान, पाण्याच्या टाक्या, झाडाच्या कुंड्या, झाडे यांचे अतोनात नुकसान करत आहेत. त्यांच्या या उपद्रवामुळे परसातील झाडे, फळे, फुले यांचे नुकसान होत आहे. बाहेर कोणत्याही गोष्टींचे वाळवण घालता येत नाही. इतकेच नव्हे तर घराची दारे, खिडक्या पण उघड्या ठेवणे अवघड झाले. घरात शिरून माकडे अन्नधान्य, भाजीपाला यांची नासाडी करत आहेत. वाळत घातलेले कपडे देखील फाडून टाकतात. यामुळे मोठी आर्थिक हानी होत आहे.

माकडे आणि वानरे यांच्या वावरामुळे घर–ातील लहान मुले, वयोवृद्ध यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. गेल्या दोन वर्षांत या वानरांनी महिला व लहान मुलांसह अनेकांवर जीवघेणे हल्ले करून गंभीर दुखापत केली आहे. घरात देखील घुसतात. त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट आहे. दिवसेंदिवस वानरांची व माकडांची संख्या वाढत आहे. टोळीटोळीने येणाऱ्या या वानरांना व माकडांना हाकलणे अशक्य होत आहे.

काही महिन्यांपूर्वी येथील राम आळीमध्ये विजेचा धक्का लागून आठवडाभराच्या अंतराने २ वानरांचा मृत्यू झाला होता. तसेच गावात बिनदिक्कत फिरणाऱ्या या वानर व माकडांना विजेचा धक्का व वाहनांची ठोकर लागण्याचा देखील धोका आहे.

# उलवे येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न ; प्रितम म्हात्रे यांची उपस्थिती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. सिद्धिविनायक मंदिर उलवे येथे श्री गणेशाचे दर्शन घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विरोधी पक्षनेतेप्रितम जनार्दन म्हात्रे उपस्थित होते. त्यानंतर सर्व स्थानिक रहिवासीयांच्या तर्फे उपस्थित माई ताई भोईर (सरपंच गव्हाण ग्रामपंचायत), हेमंत पाटील (सदस्य ग्रामपंचायत गव्हाण), राजेंद्र घरत (उपाध्यक्ष, भातगिरणी तालुका पनवेल) मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.



त्यानंतर विभागातील आरक्षित असलेल्या गार्डन प्लॉटवर विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी बोलताना प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थित रहिवासीयांना अशा प्रकारचे पर्यावरणाच्या दृष्टीने घेतलेल्या कार्यक्रमाबद्दल आभार मानले तसेच यापुढेही उलवे विभागांमध्ये कोणत्याही ठिकाणी अशा प्रकारचे सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष उलवे नोड आणि त्यांची जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था संपूर्ण भक्कम पणे रहिवासीयांच्या सोबत असेल याची ग्वाही दिली . प्रत्येक नागरिकाने नुसते झाड न लावता लावलेले झाड हे जर दत्तक घेतले आणि त्याचा आपल्या परिवारातील सदस्य प्रमाणे जतन करून त्याची वाढ केली तर त्या मधून जो सुखद अनुभव मिळतो तो कोणत्याही पैशाने विकत घेता येत नाही असे आवर्जून सांगितले. सदर कार्यक्रमाचे नियोजन सचिन राजे येरुणकर यांनी केल्या बद्दल उपस्थित मान्यवरांकडून त्यांचे सुद्धा कौतुक करण्यात आले या कार्यक्रमासाठी नामदेव साळवी (अध्यक्ष श्री सिद्धीविनायक मंदिर ट्रस्ट उलवे सेक्टर १७), सुरेश फाटक (जेष्ठ समाजसेवक ) प्रवीण झिंगे, मंगेश सावंत, निलेश पाटील, गणेश कदम, अमित जस्वाल, विनोद थोरात, नलवाडे, प्रकाश सुर्वे, विलास चांदेल, सौ. रचना सचिन येरुणकर, सौ. कीर्ती फटाक, सौ. झिंगे, सौ. कार्तिकी कदम आणि स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोघा जणांना मारहाण केल्याप्रकरणी तीघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील माताजी रिटघर येथील शहापीर दर्गा या टेकडीवर फिरण्यास गेलेल्या दोघा मित्रांना तीन अनोळखी इसमांनी मारहाण केली होती. त्यांना पनवेल शहर पोलिसांनी अवघ्या १२ तासात शोधून काढले आहे.

या ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र माताजी रिटघर येथील शहापीर दर्गा या टेकडीवर फिरण्यास गेले असताना तीन अनोळखी इसम तेथे आले व तुम्ही या ठिकाणी का आलात? तुम्हाला दुसरे काही काम नाही का? असे बोलून अनिल वर्मा यास दोघांनी हातचापटीने मारहाण केली व तिसरा इसम मोबाईलद्वारे शुटींग करीत होता. तसेच शिवीगाळ करीत होता. त्याचप्रमाणे फिर्यादीच्या हातास पकडून त्यांच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करीत होता व धमकावित होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने व गुन्हे शाखेचे निरीक्षक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि गणेश दळवी, पो.हवा.वाघमारे, पो.हवा.गंथडे, पो.ना.राठोड, पो.ना.पाटील, पो.ना.साळुंके, पो.शि.मिसाळ आदींच्या पथकाने गुप्त बातमीदाराद्वारे तसेच तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी सरफराज तय्यब साठी (२६ रा.वडघर), समीर शेख (२३ रा.वडघर), आफान जावेद पठाण या तिघांना अवघ्या १२ तासात शोधून काढून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# २१ डिसेंबरला निर्भयपणे मतदान करा! माणगांवचे भविष्य आपल्या हाती चांगले तेच निवडा

## माणगावकरांनी व्यक्त केल्या भावना

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मतदार राजा जागा हो निवडणुक नगरपंचायतची आहे. या निवडणुकीत ज्यांनी खासदारकी आमदारकी लढविली, मंत्रीपद भुषविली त्यांनी केलेली विकास कामे विधानसभा लोकसभेला मत मागताना सांगितली तर ते योग्य आहे. हे सुज्ञांस सांगणे न लागो! पण ज्या नगर पंचायतीला स्वतंत्र निधी आहे, त्याचा वापर करुन केलेल्या विकास कामांचा पाढा मतदारांपुढे वाचा. आपल्या प्रभागा–तील स्वच्छता, पाणी–पूरवठा, दिवाबत्ती सोय, रस्ते, आरोग्य सुविधांसाठी नगरपंचायत सदस्य म्हणुन, आपत्तीत, कोरोना संकटात आपण केलेली कामे जनतेसमोर ठेवा, न कि राज्यातील विधानसभा, लोकसभेतील कामांचा पाढा लोकांपूढे वाचावा.

तसच नगरसेवक म्हणुन आपली कर्तव्य जबाबदारी आपण किती पार पाडली ते सांगावे, नेमके हेच केले जात नाही. आपल्या प्रभागाचा विचार जितका महत्व–ाचा तितकाच आपल्या माणगांव शहराचे सार्वजनिक आरोग्य कसे चांगले राहिल हे ही महत्वाचे, माणगांवचा कालवा हे शहराचे सौंदर्य पण आमचे हे काम नाही! अस नगर–सेवक लोकप्रतिनीधी बोलतात. पण त्याच कालव्यामुळे माणगांवकरांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते मच्छर, दुर्गंधी मुळे शहराचे सुंदरतेला गालबोट लागते पण इकडे आजी माजी नगराध्यक्ष पण हातवर करुन जबाबदारी झटकतात. मात्र प्रचारात मोठी आश्वासन देतात याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

नगरसेवकाचे चारित्र्य देखिल महत्व–ाचा मुद्दा असुन तो ही जनतेपर्यंत प्रचारात महत्वाचा ठरतो. आपला उमेदवार नेमके यात कोठे बसतो, हे तपासुनच मतदाराने आपले मत द्यावे. ही जनजागृती प्रचारात करणे अपेक्षित आहे. प्रचार करताना वाईट सवयी मतदारांना गृहीत धरुन पैशाचे वाटप करुन निवडणुक जिंकता येते, असा समज झाला आहे. माणगांवात कचेरी रोडवर पाईप लाईन साठी खोदलेला खड्डा जनतेला होणार त्रास हा आपल्या प्रत्येकाच्या वाट्यालाही येतो, अगदी वार्डातील नगरसेवक, नगराध्यक्ष, प्रशासनाचे सर्व अधिकारी, निवडणुकीच्या प्रचाराला हौशीने आलेले पुढारी देखिल याच रस्त्यावरुन चालत, वहानाने ये–जा करतात, पण कोणालाही आपली जबाबदारी वाटत नाही.

मग निवडणुकीत विकास कामांचा पाढा वाचणारे नेमकी कोणती काम करतात ? हजारो लाखो रुपयांचा चुराडा निवडून येण्यासाठी केला जातो, मग हा पंधरा बाय दोनचा रस्त्याला पडलेला(पाडलेला) खड्डा अडथळा भरायला कितीसा खर्च येणार ? पण एकालाही तो भरावासा वाटत नाही. मग नेमक नगरसेवक म्हणुन आपण भविष्यात काय काम करणार ? पार्ट्या वायफळ खर्च करण्यापेक्षा या ठिकाणी आपत्ती ओढावण्या आधी हा खड्डा भरायला आपले कार्यकर्ते आणुन हे एक सामाजीक आदर्शवत कार्य म्हणुन का करत नाही! याचे आश्चर्य वाटते. जनतेसमोर तेच एक जबाबदार उमेदवाराचे लक्षण म्हणुन मतं मागताना उपयोगी पडेल. बेजबाबदारपणे आपली साधी साधी कर्तव्य झटकणे, मतदान मिळविण्यासाठी वाईट सवयी लावतो कोण? अशा उमेदवारांना मतदारांनी आता धडा शिकवण्याची हीच ती वेळ, लोकशाहीतील आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावताना मतदारांनी विचार करणे आवश्यक आहे.

पडद्या आडून तेच तेच चेहरे परत परत निवडणुक लढवितात! याला म्हणावे तरी काय? ही घराणेशाही कि लोकशाही, हे कोणते राजकारण? असा सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. दोष कोणाला द्यावा हेच कळेनासे झालय, हि परिस्थिती बदलने काळाची गरज आहे. हिच ती वेळ संधी येत्या २१ डिसेंबरला नगरपंचायत निवडणुकी मुळे आपणास मिळणार आहे. उभे राहीलेले सर्वच आपले आहेत, पण त्यांचे सामाजिक काम, सेवावृत्ती, चारित्र्य व आपल्या शहरा विषयीची तळमळ व भविष्यातील दूरदृष्टीकोन लक्षात घेऊनच प्रत्येकाने मतदान करावे.

तसेच कोणत्याही आमिषाला, दबावाला बळी न पडता निर्भयी मानसिकतेने आ–पला पवित्र मतदानाचा हक्क बजवावा.आपले सुंदर–स्वच्छ–शांत, निष्पक्ष माणगांवसाठी एक पाऊल टाकून जास्तीत जास्त मतदान करावे तर आणि तरच लोकशाही वाचेल! अन्यथा भविष्यात माणगांव भकास बकाल होण्यास वेळ लागणार नाही. हे कुणा राजकिय पंडीता–ज्योतिषाला विचारण्याची गरज नाही अस अनेक माणगांवकरांनी आमचेशी संपर्क करुन आपल मत व्यक्त केल आहे.

# ग्रामस्थ, नागरिकांशी चर्चा करूनच खोपटे नवेनगर क्षेत्र विकसित होणार

**दै.रायगड नगरी । उरण**


नैना खोपटा टाऊन प्लॅनिंगच्या ाफीसर प्रांजली केणी यांच्या सोबत खोपटा टाऊन प्लॅनिंगबाबत उरण मधील नागरिक, ग्रामस्थांनी माहिती घेतली.त्यांना प्लॅनींगची माहिती मिळावी याबाबत निवेदन दिले. या प्रसंगी आवरे गावातील माजी उपसरपंच हरेश म्हात्रे ,वशेणी गावातील सामाजिक कार्यकर्ते शशीकांत पाटील, उरण तालुका उपाध्यक्ष भाजपा मुकुंद गावंड हे उपस्थित होते.

खोपटा टॉऊन प्लॅनिंग हे ३२ गावातील गावाकऱ्यांना विश्वासात घेऊन करायचे आहे. उदाहरणार्थ गावात रस्ते, मैदान, शाळा, मंदीर, स्मशानभुमी, हॉस्पीटल, गटारे या सुविधा गावाकऱ्यांनी सूचवायच्या आहेत. डेव्हलपमेंट प्लॅन तयार होईल. याबाबतीत त्यांचे प्रतिनिधी दिवानजी पवार गावोगावी येऊन याबाबतची माहिती गावाकऱ्यांना देतील.अशी माहिती चर्चे दरम्यान देण्यात आली.

नैनाच्या ाफीसर प्रांजली केणी मॅडम सुद्धा स्वतः येतील किंवा त्याच्यां ाफीसमध्ये गेलो तरी याबाबतची सर्व माहिती देणार आहेत. त्याच्यांशी उपस्थित मान्यवरांनी चर्चा केली असतां त्यांनी सांगीतले की राज्य सरकारने त्यांना नैना खोपटे टॉऊन प्लॅन साठी सुचना दिल्या आहेत.

गावाकऱ्यांशी चर्चा करून प्लॅन करायचा आहे. तीन वर्षांत गावकरी सहमत असतील तर प्लॅन तयार होईल. गावकरी तयार असतील तरच खोपटा टॉऊन प्लॅन तयार होईल. अन्यथा होणार नाही अशा प्रकारे प्रांजली केणी मॅडम यांनी चांगल्या प्रकारे उपस्थित मान्यवरांना मार्गदर्शन केले.

# बल्लाळेश्वर पाली देवस्थान व वाय एम टी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलतर्फे भक्तनिवासमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबीर



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली बल्लाळेश्वर देवस्थान व वाय एम टी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता.१९) भक्तनिवास क्रमांक ०१ मध्ये मोफत आरोग्य तपासणी व अल्पदरात शस्त्रक्रिया शिबीर संपन्न झाले. या शिबिरात तब्बल शंभर जणांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

बल्लाळेश्वर देवस्थानच्या माध्यमातून वर्षभर विविध लोकोपयोगी व समाजाभिमुख उपक्रम राबविले जातात.

यावेळी मूळव्याध, भगंदर, फिशर, पोटाचे विकार, हर्निया, अपेंडीसायटीस, पायनोनिडल सायनस, हायड्रोसिस व शरीरावरील गाठी आदी आजारांची तपासणी करण्यात आली. यावेळी तज्ञ शैल्यचिकित्सक डॉ. शरदकुमार साळुंखे, डॉ. अभिषेक जाधव, डॉ. राहुल आस्कर, डॉ. किरण कुलकर्णी यांच्यासह बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धंनजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्वस्त माधव साने, उपेंद्र कानडे, सचिन साठे, राहूल मराठे व नागरिक उपस्थित होते.

# रायगड जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा नवजीवन पेझारी विजेता

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने साहान येथे आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हा पुरुष गटाच्या अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत नवजीवन पेझारी संघाने अंजिक्यपद मिळवले.

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन तर्फे रायगड जिल्हा अंजिक्यपद कबड्डी स्पर्धेचे आयोजन नवकिरण क्रिडा मंडळ भेडखळ– उरण, भैरवनाथ क्रिडा मंडळ पेझारी– अलिबाग, गावदेवी क्रीडा मंडळ मुढाणी– पेण,जय बंजरंग सहान – अलिबाग या ठिकाणी करण्यात आले होते प्रत्येक ठिकाणी ६४ संघादरम्यान स्पर्धा घेण्यात आली या चार ठिकाणा वरुन ४ प्रथम येणारे संघ असे एकुण १६ संघाची स्पर्धा सहान येथे घेण्यात आली सहान येथे झालेल्या या स्पर्धेत टी. बी. एम. कारावी, ज्ञानेश्वर कोलवे, वायुसुत ओढांगी, नवतरुण स्पोर्टस कारावी, श्री गणेश दिवलांग, गावदेवी सुडकोली, जय बंजरंग रोहा, मातृछाया कुर्डुस, जयदिप स्पोर्टस पेण, नवजीवन पेझ–ारी, काळंबादेवी युवक गडब, नवतरुण सोनारसिध्द धाटाव, स्वयभु गावदेवी भातसई, रणझुझांर कणे, जयबंजरंग बेली, म्हसोबा पेझारी हे सोळा संघ पात्र ठरले होते.



या मध्ये झालेल्या स्पर्धेत पहिल्या उपांत्य फेरीत ज्ञानेश्वर कोलवे संघाने गणेश दिवलांग संघाचा पराभव करून अंतिम फेरीतप्रवेश केला तर दुस–या उपांत्य फेरीच्या सामन्यात नवजीवन पेझारी संघाने बजरंग बेली या संघाचा पराभव करुन अंतिम फेरीत प्रवेश केला अंतिम फेरीचा सामना नवजीवन पेझारी ज्ञानेश्वर कोलवे यांच्यात झाला यांच्यात झाला. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या सामन्यात निर्धारीत वेळेत हा सामना समान गुणांवर सपल्याने पाच पाच चढाया मध्ये खेळविण्यात आलेल्या या सामन्यात नवजीवन पेझारी संघाने कोळवे संघाचा नाम मात्र एक गुणांनी पराभव करून जिल्हा अजिंक्यपद पटकावले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक नवजीवन पेझारी द्वितीय क्रमांक ज्ञानेश्वर कोलवे, तृतीय क्रमांक जय बजरंग बेली, चतुर्थ क्रमांक श्री. गणेश दिवलांग या संघाने पटकावला या स्पर्धेला माजी आमदार पाटील यांनी भेट देवून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या ही स्पर्धा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह आस्वाद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली या स्पर्धे चे पारितोषिक वितरण अनिल पाटील राज्य कबड्डी असोसिएशनचे निरीक्षक मीनानाथ धानजी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्य जे जे पाटील, उपाध्यक्ष हिराचंद पाटील,गजानन मोकल, प्रमोद म्हात्रे संजय मोकल प्रमोद ठाकूर प्रसाद भोईर, लक्ष्मण गांवड, रमेश म्हात्रे, जनार्दन पाटील ,नरेश म्हात्रे उल्हास पाटील,चंद्रकांत राऊळ , हिरामण भोईरआदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील २५६ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेतुन निवडलेला संघ २२ जानेवारी रोजी काल्हेर, तालुका भिवंडी जिल्हा ठाणे येथे होणा–या राज्य अंजिक्यपद स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे.